महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : २६६ वा | दिनांक : १९/०८/२०२५ | वार : मंगळवार

## भाजपात केवळ आयात नेत्यांचा बोलबाला : ठाकरे गटाच्या अनिल परब यांचा दावा



**मुंबई :** भाजपमध्ये केवळ आयात करण्यात आलेल्या नेत्यांचा बोलबाला सुरू असल्याचा आरोप शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते अनिल परब यांनी केला आहे. भाजपमध्ये केवळ आयात करण्यात आलेल्या नेत्यांची चलती आहे. यामुळे भाजपचे निष्ठावंत नेते व कार्यकर्ते दुखावले गेलेत. त्यांचा पक्षाकडे पाहण्याचा दृष्टिकोनही बदलला आहे, असे त्यांनी म्हटले आहे.

अनिल परब एका मराठी ऑनलाईन वृत्तपत्राशी बोलताना म्हणाले की, आज गल्लीपासून दिल्लीपर्यंत भाजपची सत्ता आहे. पण निष्ठावंतांना डावलण्यात येत असल्यामुळे पक्षात मोठी नाराजी आहे. प्रत्येक पक्षाला स्वतःला पक्ष वाढवण्याचा अधिकार आहे. त्यांना दुसऱ्या पक्षातील नेतेमंडळीही घेण्याचा अधिकार आहे. पण असे करताना आपल्या पक्षातील नेत्यांवर अन्याय होणार नाही याची काळजी घेतली पाहिजे. पण भाजपत असे होत नाही. भाजपच्या ओरिजनल कार्यकर्त्यांसोबत आम्ही काम केले आहे. आज पक्षात आयात करण्यात आलेल्या नेत्यांचा बोलबाला असल्यामुळे ते दुखावले गेलेत. हे निष्ठावंत नेते एवढे दुखावले गेलेत की, त्यांचा भाजपकडे पाहण्याचा दृष्टिकोनच बदलला आहे.

अनिल परब यांनी यावेळी भाजपमध्ये सध्या ३५ टक्के ओरिजनल व ६५ टक्के आयात करण्यात आलेल्या कार्यकर्त्यांचा समावेश असल्याचाही दावा केला. ते म्हणाले, भाजपमध्ये सध्या ३५ टक्के ओरिजनल, तर ६५ टक्के आयात केलेले कार्यकर्ते असा फॉर्म्युला आहे. ज्यांनी पक्षासाठी रात्रंदिवस काम केल, ज्यांनी त्याकाळी आमच्या खांद्याला खांदा लावून काम केले, ज्या मंडळांनी पक्षासाठी सतरंज्या उचलल्या. आज त्यांना दूर लोटण्याचे काम केले जात आहे. भाजपने माधव भंडारी यांना काय दिले? मधू चव्हाण यांना एकदा आमदारकी दिली. पण त्यासाठी बाळासाहेब ठाकरे यांनी प्रयत्न केले होते. शिवसेनेच्या वाट्याला आलेली आमदारकी बाळासाहेबांनी मधु चव्हाण यांना दिली होती. तेव्हा प्रमोद महाजन यांनी ही जागा देण्याचा आग्रह धरला होता. पण आज कित्येकजण मंत्रिमंडळाच्या बाहेर आहेत. यात संजय कुटे सारखा विदर्भातील चेहराही मंत्रिमंडळात नाही. याचे दुःख भाजपमधील ओरिजनल मंडळींना होत आहे, असे ते म्हणाले. ते पुढे म्हणाले, मागील काही वर्षांत भाजप नेते किरीट सोमय्या यांनी अनेकांवर आरोप केले. ते सोमय्या आज कुठेही दिसत नाहीत. त्यांनाही सरकारपासून दूर ठेवण्यात आले. या प्रकरणी सर्व जवळच्या नेत्यांना लांब ठेवले जात असल्याचे लक्षात घेतले पाहिजे. मुख्यमंत्र्यांच्या जवळ इतर पक्षातून आलेल्या नेत्यांचीच वर्दळ दिसून येते. त्याचे दुःख पक्षातील नेत्यांना होत आहे.

## मुख्यमंत्री लवकरच शेतकरी कर्जमाफीची घोषणा करतील - संजय राठोड



**यवतमाळ :** राज्यात एकीकडे मुसळधार पावसामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले असताना, दुसरीकडे शेतकरी कर्जमाफीचा मुद्दा पुन्हा एकदा चर्चेत आला आहे. याच पार्श्वभूमीवर, महायुती सरकारमधील मंत्री संजय राठोड यांनी शेतकऱ्यांसाठी एक मोठी बातमी दिली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस लवकरच शेतकरी कर्जमाफीची घोषणा करतील, असे संकेत त्यांनी दिले आहेत. आज ते यवतमाळमधील पुसद येथे एका कार्यक्रमात बोलत होते.

महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी काही दिवसांपूर्वी "कर्जमाफीसंदर्भात मुख्यमंत्री लवकरच निर्णय घेतील" असे आश्वासन दिले होते. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनीही "आमच्या जाहीरनाम्यानुसार कर्जमाफी केली जाईल" असे स्पष्ट केले होते. त्यात आता मंत्री संजय राठोड यांनीही शेतकरी कर्जमाफीसंदर्भात सूतोवाच केल्यामुळे, गेल्या अनेक दिवसांपासून कर्जमाफीच्या प्रतीक्षेत असलेल्या शेतकऱ्यांमध्ये आशेचा किरण निर्माण झाला आहे.

हरितक्रांतीचे प्रणेते व माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या ४६ व्या स्मृतिदिनानिमित्त यवतमाळच्या पुसद येथे वसंतराव नाईक कृषी प्रतिष्ठानतर्फे राज्यातील प्रयोगशील १३ शेतकऱ्यांना कृषी गौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला. या सोहळ्यात बोलताना यवतमाळचे पालकमंत्री संजय राठोड यांनी उपरोक्त विधान केले. संकटग्रस्त शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्यासंदर्भात राज्य मंत्रिमंडळात चर्चा सुरू आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे लवकरच शेतकऱ्यांसाठी कर्जमाफीची घोषणा करतील, अशी माहिती त्यांनी दिली. तसेच, पुसदच्या माळ पठारावरील दुष्काळग्रस्त ४० गावांना पाणी उपलब्ध करून देऊन तेथील दुष्काळ कायमचा दूर करण्याचे आश्वासनही त्यांनी दिले.

यापूर्वी राज्याचे कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनीही शेतकऱ्यांच्या कर्जमाफीची गरज असल्याचे मान्य केले होते. "मी शेतकरीपुत्र असल्याने शेतकऱ्यांच्या अडचणी मला चांगल्या प्रकारे माहित आहेत. एक शेतकरी म्हणून कर्जमाफीची गरज असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले होते. मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्री मिळून यावर योग्य वेळी निर्णय घेतील, असे त्यांनी स्पष्ट केले होते.

## लोकसभेत अंतराळवीर शुभांशू शुक्लांवर विशेष चर्चा



**नवी दिल्ली :** मतचोरीच्या आरोपावरून विरोधकांच्या गदारोळात, भारतीय हवाई दलाचे ग्रुप कॅप्टन शुभांशु शुक्ला यांच्या यशस्वी अंतराळ मोहिमेवर लोकसभेत दुपारी 2 वाजता चर्चा सुरू झाली. केंद्रीय मंत्री जितेंद्र सिंह म्हणाले की, आज देश शुभांशूंच्या परतीच्या अंतराळ मोहिमेचा आनंद साजरा करत आहे परंतु विरोधी पक्ष अजूनही गोंधळ घालत आहेत आणि चर्चेसाठी तयार नाहीत.

मतदार पडताळणी आणि मतचोरीच्या आरोपावरून विरोधक संसदेत मुख्य निवडणूक आयुक्तांविरुद्ध महाभियोग प्रस्ताव आणू शकतात. काँग्रेसचे राज्यसभा खासदार सय्यद नसीर हुसेन यांनीही वृत्तसंस्थेला सांगितले की, गरज पडल्यास महाभियोग प्रस्तावासह सर्व लोकशाही पद्धती वापरण्यास पक्ष तयार आहे. तथापि, अद्याप कोणतीही औपचारिक चर्चा झालेली नाही.

दरम्यान, सोमवारीही लोकसभेत आणि संसदेत राज्यसभेत विरोधकांचा गदारोळ सुरूच होता. बिहार मतदार पडताळणीबाबत लोकसभेत विरोधकांनी घोषणाबाजी केली. खासदारांनी वोट चोर गद्दी छोड आणि आम्हाला न्याय हवा आहे अशा घोषणा दिल्या.

लोकसभा अध्यक्षांच्या इशाऱ्यानंतरही गदारोळ सुरूच होता. यामुळे लोकसभेचे कामकाज दुपारी 12 वाजेपर्यंत आणि नंतर कामकाज पुन्हा सुरू झाल्यावर दुपारी 2 वाजेपर्यंत तहकूब करावे लागले.

आज सभागृहात ग्रुप कॅप्टन शुभांशू शुक्ला यांच्या अंतराळ प्रवासाच्या यशावर विशेष चर्चा होणार आहे. दरम्यान, विरोधकांच्या गदारोळानंतर राज्यसभेचे कामकाजही दुपारी 2 वाजेपर्यंत तहकूब करण्यात आले आहे. दुपारी 2 वाजता कामकाज पुन्हा सुरू झाले.



# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार १९ ऑगस्ट २०२५

## राखी ही बहिण-भावाच्या प्रेमाचे व रक्षणाचे प्रतीक आहे - प्राचार्य केशव भांगे



**शिरूर कासार (प्रतिनिधी) :** दि.१४ ऑगस्ट २०२५ गुरूवार रोजी आदर्श शिक्षण संस्था, बीड द्वारा संचलित,कालिकादेवी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय,शिरूर (का.) येथे "रक्षाबंधन" हा उत्सव विद्यालयाचे प्राचार्य केशव भांगे साहेब यांच्या उपस्थितीत आणि मोठ्या आनंदात पार पडला. इ.५ वी ते १२ वी वर्गातील सर्वच मुलांना तसेच प्राध्यापक,शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी या सर्वांना मुलींच्या हस्ते राख्या बांधण्यात आल्या.यावेळी प्राचार्य भांगे साहेबांनी भाषणातून सांगितले की,भारतीय संस्कृतीत बहीण-भावाच्या प्रेम,रक्षण आणि काळजीचे प्रतीक म्हणजे 'रक्षाबंधन' होय.यामुळेच रक्षाबंधन या उत्सवाला मानवी जीवनात विशेष महत्व आहे. राखीचा धागा भावाच्या हातात बांधून बहिण औक्षण करून आपल्या पवीत्र नात्याची वीन अधिक घट्ट करते.अशा पवीत्र सणाचे महत्त्व लक्षात घेऊन आपल्या बहिणींचे संरक्षण करण्यासाठी सर्व भावांनी जबाबदारी घेतली पाहिजे,असा सल्ला विद्यार्थ्यांना दिला. यावेळी उपप्राचार्य प्रा. बसवेश्वर देशमाने,पर्यवेक्षक जनार्दन काळे,विज्ञान प्रमुख प्रा. संजय काकडे,परीक्षा प्रमुख प्रा. नामदेव तरकसे,क्रीडा प्रमुख श्री रविंद्र बडे, प्रा. बाळासाहेब खटाणे,प्रा.महारूद्र डोंगरे, सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. आत्माराम झिंजुर्डे, प्रा.विश्वास ढाकणे, प्रा.संजय आव्हाड, प्रा.अनिल जरे, प्रा.प्रशांत मळेकर,प्रा.अशोक इनकर, प्रा.महादेव हांगे, प्रा.बिभिषण घायाळ, प्रा.नारायण तांबे, प्रा.दत्ता शिंदे, प्रा.लक्ष्मण गव्हाणे, प्रा.दत्ता गायकवाड, प्रा.विनोद गलांडे, प्रा.घनश्याम चव्हाण, प्रा.शशिकांत जावळे, प्रा. अशोक घोडके, प्रा. सत्यनारायण ढवळे,प्रा.हनुमंत घायाळ, प्रा. सविता दराडे, प्रा.रेखा निर्मळ, प्रा.सिमा ढवळे, सौ,अनिता लाटे, आबासाहेब ढवळे,वसंत आहेर, राजू बडे,जयेंद्र निकम, आप्पासाहेब कांबळे, नितीन बहिर, प्रकाश साऊत,रविंद्र शिंदे तसेच प्राध्यापक,शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## नाशिक रोड कॅंप केंद्रीय विद्यालयात ५४ वे राष्ट्रीय धनुर्विद्या प्रशिक्षण शिबिर संपन्न



**नाशिक (प्रतिनिधी) :** केंद्रीय विद्यालय संघटनच्या मुंबई विभागीय कार्यालयाच्या वतीने दिनांक १५ ते १७ ऑगस्ट २०२५ दरम्यान शहरातील पीएम श्री केंद्रीय विद्यालय क्रमांक १, नाशिक रोड कॅम्प येथे ५४ व्या केव्हीएस एनएसएम-२०२५ धनुर्विद्या प्रशिक्षण शिबिराचे यशस्वीरित्या आयोजन करण्यात आले. या तीन दिवसांच्या कार्यक्रमात मुंबई विभागातील केंद्रीय विद्यालयांमधील १४ वर्षांखालील, १७ वर्षांखालील आणि १९ वर्षांखालील 17 मुले आणि 14 मुलींना प्रशिक्षण देण्यात आले असल्याची माहिती प्राचार्य गजराज मीना यांनी दिली. यावेळी धुळे येथील व्ही.डी. गावित आणि न्यू माजरी नागपूर येथील सोनू मालवीय यांनी प्रशिक्षक म्हणून खेळाडूंना मार्गदर्शन केले. या प्रशिक्षण शिबिराचा उद्देश विद्यार्थ्यांच्या धनुर्विद्या कौशल्यांना चालना देणे, त्यांना मौल्यवान प्रशिक्षण देणे आणि तज्ज्ञ प्रशिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली त्यांचे तंत्र सुधारण्यासाठी अनुभव देणे हा होता. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांमध्ये शिस्त, लक्ष केंद्रित करणे आणि टीमवर्क निर्माण करण्यासाठी धनुर्विद्यासारख्या खेळांचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले, ज्यामुळे त्यांना त्यांच्या प्रतिभेचे प्रदर्शन करण्यासाठी आणि उच्च-स्तरीय स्पर्धांसाठी भविष्यातील प्रतिभा ओळखण्यासाठी एक व्यासपीठ उपलब्ध झाले, असे मनोगत प्राचार्य गजराज मीना यांनी व्यक्त केले. शिबिराच्या यशस्वीतेसाठी कल्पना शिंदे, ज्ञानेश्वर सरताळे, शुभम यादव सिमरन, अंजली सक्सेना, बिरबल यादव, महादेव इघारे आदींनी परिश्रम घेतले.

## संत तुकाराम महाविद्यालयात रेड रिबन क्लबची नवीन कार्यकारणी जाहीर




**कन्नड:** शहरातील संत तुकाराम महाविद्यालयातील रेड रिबन क्लबची नवीन कार्यकारणी डॉ. सिकंदर कुरेशी यांच्या हस्ते जाहीर करण्यात आली. यावेळी राष्ट्रीय सेवा योजना व रेड रिबन क्लब मार्फत डॉ. कुरेशी यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. आपल्या मार्गदर्शनात डॉ. कुरेशी यांनी एच आय व्ही व एड्स या आजारांची कारणे, प्रतिबंधात्मक उपाय व उपचार याविषयी माहिती दिली, तसेच विद्यार्थ्यांनी या आजाराविषयी जनजागृती करावी असे आवाहन त्यांनी केले. संजय सोनवणे यांनी देखील एच आय व्ही व एड्स बाबत सविस्तर मार्गदर्शन केले. याप्रसंगी रेड रिबन क्लबच्या वतीने संभाजीनगर येथे आयोजित मॅरेथॉन स्पर्धेमध्ये सलग दोन वर्षे प्रथम येणारा महाविद्यालयाचा विद्यार्थ्या व रेड रिबन क्लबचा उपाध्यक्ष अतुल चव्हाण याचा सत्कार मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक रेड रिबन क्लबचे समन्वयक डॉ. सुधीर पवार यांनी केले. यावेळी त्यांनी महाविद्यालयात रेड रिबन क्लब मार्फत घेण्यात येणाऱ्या उपक्रमांची माहिती दिली. महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. शरद गावंडे हे अध्यक्षस्थानी होते, त्यांनी आपल्या भाषणात विद्यार्थ्यांनी रेड रिबन क्लबमध्ये सहभाग घेऊन समाजाप्रती आपले कर्तव्य पार पाडावे असे आवाहन केले. याप्रसंगी शशिकांत गांगुर्डे, उपप्राचार्या डॉ. सरला गोरे आदी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते. उपस्थितांचे आभार राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी तुकाराम कोल्हे यांनी मानले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. कल्पना देशमुख यांनी केले. यावेळी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

ADMISSION OPEN

10th, 12th and Graduate Students
Government Recognised
Job Guarantee Courses

DMLT
P.G.DMLT
X-RAY
C.T.-SCAN
E.C.G.
Radiology
Physiotherapy
Optometry
O. T. TECHNICIAN
PG Radiology

Contact: 9405109103
8830838903

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार १९ ऑगस्ट २०२५


## मनपा शाळेत भारताचा ७९ वा स्वातंत्र्य दिन मोठ्या उत्साहात साजरा



**छत्रपती संभाजीनगर** : मनपा केंद्रीय प्राथमिक व माध्यमिक शाळा, मुकुंदवाडी येथे भारताचा 79 वा स्वातंत्र्य दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमास शालेय व्यवस्थापन समितीचे पदाधिकारी तसेच मुकुंदवाडी परिसरातील प्रतिष्ठित नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.याप्रसंगी शाळेचे मुख्याध्यापक श्री. के. बी. चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली विविध कार्यक्रम पार पडले. शाळेतील सर्व शिक्षक व कर्मचारी उपस्थित राहून विद्यार्थ्यांना स्वातंत्र्य दिनाचे महत्व पटवून दिले. कार्यक्रमानंतर सर्व पाहुण्यांचा सत्कार करण्यात आला व विद्यार्थ्यांना अल्पोपहाराचे वाटप करण्यात आले.

## ७९ वा स्वातंत्र्य दिन मोठ्या उत्साहात साजरा



**छत्रपती संभाजीनगर** : मनपा प्राथमिक व माध्यमिक विद्यालय चिकलठाणा येथे आपल्या भारत देशाचा ७९ वा स्वातंत्र्य दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमास शालेय व्यवस्थापन समितीचे पदाधिकारी व महिला सदस्य तसेच चिकलठाणा परिसरातील प्रतिष्ठित नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. याप्रसंगी शाळेचे मुख्याध्यापक श्री पी. पी. शिंदे सर यांच्या मार्गदर्शनाखाली विविध सांस्कृतिक कार्यक्रम घेण्यात आले. यात भाषण स्पर्धा,देशभक्तीपर गीतांवर नृत्य आणि लेझीम घेण्यात आली. शाळेतील सर्व शिक्षक व कर्मचाऱ्यांनी उपस्थित राहून विद्यार्थ्यांना देशभक्ती स्वातंत्र्य दिनाचे महत्त्व सांगितले. कार्यक्रमाच्या शेवटी सर्व पाहुण्यांचे आदरातिथ्य करण्यात आले व विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

## संत ज्ञानेश्वर महाराज सप्तशतकोत्तर सुवर्ण महोत्सवी जयंती निमित्त कार्यक्रम संपन्न



**छत्रपती संभाजीनगर** : संत श्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराज यांच्या सप्तशतकोत्तर सुवर्ण महोत्सवी ७५० जयंती वर्ष निमित्त डॉ. सौ. इंदिराबाई भास्करराव पाठक कनिष्ठ महाविद्यालयात सामुहिक पसायदान व व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. सुनिता बाजपाई या होत्या तर प्रमुख वक्त्या म्हणून वरिष्ठ महाविद्यालयातील मराठी विषयाच्या प्राध्यापिका डॉ. प्रेमला मुखेडकर या होत्या. यावेळी कनिष्ठ महाविद्यालयाच्या पर्यवेक्षिका प्रा. माधुरी भावसार यांची प्रमुख उपस्थिती होती. पसायदानाचे महत्व सांगताना डॉ. प्रेमला मुखेडकर यांनी सांगितले की, संत ज्ञानेश्वरांनी सर्वसामान्य जनतेला समजेल अशा भाषेत गीता ज्ञान मराठीत ज्ञानेश्वरीच्या स्वरूपात आणले. आज विज्ञानामुळे मानवाने कितीही प्रगती केली तरी लोक खऱ्या ज्ञानापासून दूर जात आहेत. त्यामुळे प्रत्येकाच्या जीवनात आनंद हरवला आहे तो प्राप्त करण्यासाठी आत्मज्ञान प्राप्त करण्याची गरज आहे. पसायदान ही फक्त धार्मिक प्रार्थना नाही तर ती सामाजिक, नैतिक आणि आध्यात्मिक दृष्टिकोनातून जगण्याची मागणी आहे. प्रत्येकाचे वर्तन नितीनुसार योग्य आचरण करणारे असावे. ते वर्तन सत्य, प्रामाणिकपणा न्याय ,जबाबदारी आणि चांगुलपणावर आधारित असावे.संत ज्ञानेश्वर विश्वात्मक देवाकडे वाणी द्वारे प्रसन्न होऊन प्रसाद रूप आशीर्वाद सर्व मानव प्राणीमात्रांच्या कल्याणासाठी पसायदान मागतात. दुष्टांचे दुष्टपण नाहीसे होऊन त्यांच्यामध्ये सत्कर्म वाढीला लागावे. सर्व जीवांमध्ये मैत्री भाव निर्माण व्हावा, दुःख आणि अज्ञानाचा अंधार नाहीसा व्हावा, विश्वात ज्याला जे हवे ते मिळावे. सर्व प्रकारच्या मांगल्याचा वर्षाव करणारे संत पुरुष जन्माला यावे आणि अशा सत्पुरुषांचा सहवास प्रत्येकाला भेटावा, त्यांच्या सहवासातून सर्वांमध्ये चेतना निर्माण व्हावी, कारण हे सगळे संत कल्पतरू आहेत. रत्नांची खाण आहेत, अमृताचे समुद्रच आहेत, म्हणून अशा सत्पुरुषांच्या सहवास सर्वांना मिळावा. चंद्राची निर्मळ शीतलता सूर्याचा प्रकाश ज्याप्रमाणे लाभतो त्याप्रमाणे सर्व सज्जन संत आहेत. विश्वातील सर्व लोक सुखी व्हावेत. या ग्रंथाचे ज्ञान घेऊन, सर्व विकारावर मात करून आत्मिक उन्नती करावी असे पसायदान विश्वेश्वराकडे ज्ञानेश्वर मागतात तेव्हा ज्ञानेश्वरांचे गुरु निवृत्तीनाथ हा प्रसाद तुला नक्की लाभेल असा आशिर्वाद देतात तेव्हा ज्ञानदेव आनंदी होतात. अशा प्रकारे पसायदानामधून वैश्विक बंधुभाव, प्रेम, आनंद ज्ञानेश्वरांनी मागितलेला आहे. असे प्रतिपादन डॉ. प्रेमला मुखेडकर यांनी केले. कार्यक्रमाच्या अध्यक्ष प्राचार्य डॉ. सुनिता बाजपाई यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, पसायदानातील विचारांचा आपल्या जीवनात प्रत्यक्ष उपयोग करावा. विविध उपक्रमात सक्रिय सहभाग घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे त्यांनी कौतुक केले. ज्ञानेश्वरी सर्वांनी वाचली पाहिजे, समजून घेतली पाहिजे. त्यानुसार आचरण केले पाहिजे असे प्रतिपादन डॉ. सुनिता बाजपाई यांनी केले. प्रास्ताविक व सूत्रसंचालन डॉ. प्रभाकर गायकवाड यांनी केले तर शिला जीरे यांनी आभार मानले. यावेळी कनिष्ठ महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, विद्यार्थी - विद्यार्थिनी यांची उपस्थिती होती.






# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार १९ ऑगस्ट २०२५


## डॉ. विजयकुमार गावित सर्वात भ्रष्ट माणूस - के. सी. पाडवी



**नंदुरबार :** नंदुरबार जिल्ह्यात राजकीय आरोप-प्रत्यारोपांमुळे वातावरण तापले आहे. माजी मंत्री डॉ. विजयकुमार गावित यांनी काँग्रेस आणि शिवसेना शिंदे गटातील नेते चोर असल्याचा आरोप केल्यानंतर, काँग्रेस नेते आणि माजी मंत्री के.सी. पाडवी यांनी त्यांना सडेतोड उत्तर दिले आहे. डॉ. गावित हे 'सर्वात भ्रष्ट माणूस' असल्याचे पाडवी यांनी म्हटले आहे. तसेच त्यांच्यावर सहा हजार कोटींच्या भ्रष्टाचाराचा आरोप असल्याचेही ते म्हणालेत.

नंदुरबार जिल्ह्यातील काँग्रेस आणि शिवसेना शिंदे गटाचे नेते चोर आहेत. कुठल्याही काँग्रेस आणि शिवसेनेच्या कार्यकर्त्यांनी तुम्हाला त्रास दिला तर त्यांना माझे नाव सांगा. मी तुमच्यासोबत आहे. त्यामुळे कुणालाच घाबरायचे काम नाही, असे विजयकुमार गावित म्हणाले होते. त्यांच्या या टीकेवर के.सी. पाडवी यांनी प्रत्युत्तर देत गावित यांच्यावर थेट भ्रष्टाचाराचे गंभीर आरोप केलेत.

डॉ. गावित यांच्या 'चोर' या विधानावर पलटवार करताना के. सी. पाडवी म्हणाले, डॉ. गावित हे स्वतः माजी मंत्री आहेत आणि त्यांनी सत्तेत असताना मोठा भ्रष्टाचार केला आहे. गावित यांनी विरोधकांनाच नव्हे तर स्वतःच्या सोबत असलेल्या शिवसेना शिंदे गटालाही चोर म्हटले आहे. गावित किती वर्ष सत्तेत राहिले, किती वेळा मंत्री झाले, हे जनतेला चांगलंच माहीत आहे. २००४ ते २००९ या काळात आदिवासी विकास खात्यात मोठा घोटाळा झाला. आजही आश्रमशाळांमध्ये निकृष्ट दर्जाचे साहित्य सडत पडलेले आहे, असा आरोप के. सी. पाडवी यांनी केला.

पाडवी यांनी पुढे म्हटले की, डॉ. गावित यांच्यावर गायकवाड समिती नेमण्यात आली असून, त्यांच्याविरुद्धची उच्च न्यायालयात केस सुरू आहे. त्यांच्यावर सहा हजार कोटी रुपयांच्या भ्रष्टाचाराचे आरोप आहेत. "हा माणूस भ्रष्टाचार केल्याशिवाय जगूच शकत नाही," अशा कठोर शब्दांत त्यांनी डॉ. गावित यांच्यावर टीका केली.

के. सी. पाडवी म्हणाले, गावित यांच्या भ्रष्टाचार करण्याची पद्धतीमुळे नंदुरबार जिल्ह्यात जिल्हा परिषदेवर सत्ता असताना तीन खिडक्या योजनेचे नाव त्यासाठी पडले आहे. अजून देखील ते जिल्हा परिषदेवर पुन्हा सत्ता येण्यासाठी भाषण करत फिरत आहेत. काँग्रेस आणि शिवसेना हे चोर आहेत असे म्हणत आहेत. परंतु ते किती चोर आहेत हे संपूर्ण जनतेला माहित आहे.

डॉ. गावित यांच्यासारखा भ्रष्टाचारी माणूस या देशात आदिवासींपैकी पहिला आहे. त्यांनी आताच केलेल्या गायी वाटपात किती भ्रष्टाचार झाला आहे ते सर्वांना माहित आहे. या गायी जिवंत आहेत का नाही? दूध देत आहेत का नाही? हे सर्व जनतेला माहित आहे. त्यांना परत केसमध्ये टाकावे लागणार आहे. त्यांची मस्ती आता उतरावी लागणार आहे, अशी घणाघाती टीका के. सी. पाडवी यांनी केली.

## संतोष देशमुखांच्या मारेकऱ्यांना जामीन मिळणार? ३० ऑगस्टला फैसला



**बीड :** बीड जिल्ह्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणाची आज विशेष मकोका कोर्टात सुनावणी झाली. त्यात आरोपींच्या वकिलांनी आपल्या अशिलांचा या प्रकरणाशी कोणताही संबंध नसल्याचा दावा करत त्यांना जामीन मंजूर करण्याची विनंती केली. पण फिर्यादी पक्षाने हे अत्यंत गंभीर प्रकरण असल्याचे नमूद करत आरोपींना कोणताही दिलासा देण्यास कडाडून विरोध केला. त्यामुळे कोर्टाने आपला फैसला ३० ऑगस्टपर्यंत राखून ठेवला. आता या प्रकरणातील आरोपींना जामीन मिळणार की ते तुरुंगातच खितपत राहणार याचा फैसला या महिन्याच्या शेवटी होणार आहे.

संतोष देशमुख यांची गतवर्षी ९ डिसेंबर रोजी निर्घृण हत्या करण्यात आली होती. या प्रकरणी माजी मंत्री धनंजय मुंडे यांचे विश्वासू समजल्या जाणाऱ्या वाल्मीक कराडसह इतर आरोपींना अटक केली होती. या सर्वांनी आता जामिनीसाठी अर्ज दाखल केला आहे. त्यांच्या याचिकेवर आज विशेष मकोका कोर्टात सलग ३ तास सुनावणी झाली. त्यात वाल्मीक कराडच्या वकिलाने १ तास ४५ मिनिटे युक्तिवाद करत जामिनाची मागणी केली. विशेषतः वाल्मीक कराड याला अटक करताना कोणतेही कारण देण्यात आले नव्हते, अशी बाबही त्यांनी यावेळी कोर्टाच्या निदर्शनास आणून दिली.

त्यावर विशेष सरकारी वकील उज्ज्वल निकम यांनी जोरदार हरकत घेतली. तसेच आवादा कंपनीचे कर्मचारी सुनील शिंदे यांनी रेकॉर्ड केलेल्या फोन कॉलची तारीख चुकीची असल्याचा आरोपींचा युक्तिवादही त्यांनी सीडीआर दाखल करून जोरकसपणे फेटाळून लावला. सीडीआरनुसार वाल्मीक कराडने त्या दिवशी सुनील शिंदे यांना फोन केला होता. त्याची नोंद आहे. या संभाषणाशी संबंधित पुरावे योग्यवेळी कोर्टात सादर केले जातील, असे ते म्हणाले.

यावेळी आरोपी विष्णू चाटे याच्याही वकिलांनी आपली बाजू मांडली. आपल्या अशिलावर कोणताही गुन्हा दाखल नसल्याचा दावा त्यांनी केला. पण उज्ज्वल निकम यांनी त्यांच्या या दाव्यावरही जोरदार हरकत नोंदवली. विष्णू चाटे हा वाल्मीक कराडचा राईट हँड आहे. त्याने वाल्मीकला पूर्ण मदत केली. त्यामुळे मकोका कायद्याच्या तरतुदी या गुन्ह्याला लागू होतात आरोपीला नाही, असे ते म्हणाले. यावेळी त्यांनी विष्णू चाटेची गुन्हेगारी पार्श्वभूमीच कोर्टापुढे मांडत आरोपीचा दोषमुक्तीचा अर्ज फेटाळण्याची विनंती केली. यामुळे विष्णू चाटेच्या वकिलांची चांगलीच पंचाईत झाली.

दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकल्यानंतर न्यायालयाने आपला निर्णय ३० ऑगस्टपर्यंत राखून ठेवला. त्या दिवशी आरोपींना जामीन मिळतो की त्यांना तुरुंगातच रहावे लागेल हे स्पष्ट होणार आहे. दरम्यान, वाल्मीक कराडच्या वकिलांनी या प्रकरणी हायकोर्टाचे दार ठोठावण्याचे संकेत दिलेत.





